# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक – ३७२/२०२४ दिनांक ०७/१०/२०२४

## प्रेस नोट

### "मंत्रालयात लिपीक पदावर नोकरीचे बनावट नियुक्ती पत्र देवुन आर्थिक फसवणुक करणाऱ्या दाम्पत्यास अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश"

दिनांक ०१.०८.२०१८ ते दिनांक ०१.०६.२०२४ रोजी पावेतो तक्रारदार निक्की दिनानाथ भोईर रा.मुर्धा गांव, भाईदर पश्चिम यांना मंत्रालयामध्ये लिपीक पदावर नोकरी लावतो त्यासाठी मंत्रालयात पैसे भरावे लागेल असे खोटे सांगून आरोपी सागर चंद्रकांत कासारे व त्यांची पत्नी दोन्ही रा. मालाड, मुंबई यांनी त्याचेकडुन वेळोवेळी ४,२०,०००/- रुपये रोख विश्वासाने घेवून त्यास मंत्रालयात लिपीक पदावर नोकरीचे बनावट नियुक्ती पत्र देवून आर्थिक फसवणूक केल्याने नमूद आरोपी विरुध्द भाईदर पो.स्टे. गुनाक्र. २८१/२०२४, भांदविसंक ४२०, ४०६, ३४ प्रमाणे दिनांक ०१.०९.२०२४ रोजी २०.३५ वाजता दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील निष्पन्न पती-पत्नी आरोपी नामे सागर चंद्रकांत कासारे हे गुन्हा दाखल झाले पासून ते त्यांचे राहते घर बदलुन दुसरीकडे राहण्यास गेले होते. तेव्हा पासून पोलीसांना मिळुन येत नव्हते. तसेच नमुद दाम्पत्य आरोपीतांच्या ठावठिकाणबाबत काहीएक उपयुक्त माहीती नसताना पोउपनिरी. हितेंद्र विचारे व पोहवा/ संग्राम गायकवाड, पोशि.साकेत माघाडे यांनी सदर बाबत सखोल तपास केला असता त्यांना नमुद दाम्पत्य आरोपी हे साई सदन चाळ, रुम नं. ०१, राजनपाडा, मालाड, मुंबई येथे राहत असल्याची गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली. त्याबाबत अधिक तपास केला असता आरोपी नामे सागर चंद्रकांत कासारे हा मालाड पुर्व, मुंबई येथे त्याचे राहते घराचे जवळ येणार असल्याची माहीती मिळाली असता त्यास दिनांक ०५.१०.२०२४ रोजी ०१.१५ वाजता शिताफीने ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच महीला आरोपी ही सिनेमॅक्स सिनेमागृह, मिरारोड पुर्व येथे येणार असल्याची माहीती मिळाली असता तिला देखील मपोशि. चैताली सानप हीचे हस्ते दिनांक ०५.१०.२०२४ रोजी ०१.१५ वाजता शिताफीने ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर बाबत भाईदर पोलीस ठाणे यांना माहीती देवून गुन्हयातील दोन्ही पती-पत्नी पाहिजे आरोपी सागर चंद्रकांत कासारे वय-४७ वर्षे व पत्नी यांना पुढील कारवाईकामी ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे व सहा.पोलीस आयुक्त

(गुन्हे) श्री.मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोनि. राहुल राख, पोनि. धनंजय पोरे, सपोनि. नितीन बेद्रे, पोउपनि. हितेंन्द्र विचारे, सफौ. श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा. संग्राम गायकवाड, हनुमंत सुर्यवंशी, शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, राजाराम काळे, सतिष जगताप, प्रविणराज पवार, महेश वेल्हे, अनिल नागरे, राजविंर संधु, पोशि. साकेत माघाडे, नितीन राठोड, अंगद मुळे, अकील सुतार, मपोशि. चैताली सानप, मसुब सचीन चौधरी, सफौ. संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.

----000----